क्रमांक: मपोअ/प्रशि.2/परि.पो.उप.अधी./सत्र क्र.32/सीपीटीपी-10/ 2234 /2025 नाशिक, दिनांक: /03/2025 24 MAR 2025

## परि.पोलीस उप अधीक्षक, सत्र क्र.32 उमेदवारांना मार्गदर्शक सूचना

1. राज्यसेवा परीक्षा-2022 च्या अंतिम निकालान्वये शिफारस प्राप्त ठरलेल्या परिविक्षाधीन अधिकारी यांचा एकत्रित परिविक्षाधिन प्रशिक्षण कार्यक्रम-10 (सीपीटीपी-10) दिनांक 02/04/2025 रोजी सुरु होणार असुन सदर उमेदवारांनी महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे सकाळी 10:00 वा. पर्यंत प्रशिक्षणासाठी हजर रहावे.
2. प्रशिक्षणामध्ये बाहयवर्ग प्रशिक्षण, शारीरीक कवायत, धावणे, पी.टी., योगा, मैदानी खेळ यांचे प्रशिक्षण नियमितपणे करावे लागणार आहे. त्याकरीता उमेदवारांचे शारिरीक स्वास्थ्य, सुदृढ असणे आवश्यक आहे. काही उमेदवारांमध्ये कॅल्शियम, विटामीन डी, बी-2, लोह, हिमोग्लोबीनची कमतरता असल्याने त्यांना दुखापत होण्याची शक्यता असते. त्यामुळे प्रशिक्षणास हजर होतांना उमेदवारांनी खालील प्रकारची वैद्यकीय चाचणी करुन त्याचा अहवाल हजर होताना सादर करावा.

   Routine Blood Test :-

   A) हिमोग्लोबीन (Hemoglobin) व बी-12

   B) व्हिटॅमीन डी (Vitamin-D)

   C) कॅल्शियम (Calcium)

   D) HBAIC

   E) CBC

   F) B.S.L(Fasting & (P.P)

   G) Thyroid
3. दिनांक 02/04/2025 रोजी महाराष्ट्र पोलीस ॲकडमी, नाशिक येथे हजर होताना परि.पोलीस उप अधीक्षक यांनी खालील नमुद कागदपत्रांच्या मुळ प्रती/साक्षांकित प्रती नचुकता सोबत आणाव्यात.

   1) आधार कार्ड, पॅन कार्ड, मतदान कार्ड 2) यापुर्वी शासकीय सेवेत असल्यास कार्यमुक्ती आदेश/राजीनामा 3) वैद्यकीय प्रमाणपत्र 4) चारित्र्य पडताळणी प्रमाणपत्र 5) साक्षांकन नमुना फॉर्म 6) MPSC फॉर्म 7) बंधपत्र 8) जात प्रमाणपत्र व जात वैधता प्रमाणपत्र 9) 30% फॉर्म (महिला) 10) NCL तसेच सदर कागदपत्रांचे दोन सेट झेरॉक्स सोबत आणावेत.
4. महाराष्ट्र पोलीस अकादमी, नाशिक येथे हजर झाल्यानंतर उमेदवारांना अकॅडमीतील सेंट्रल स्टोअर्समधुन आवश्यक असलेले साहित्य पुरवण्यात येईल व त्या रकमेचा भरणा उमेदवाराने स्वत: ऑनलाईन/डेबिट कार्ड/क्रेडीट कार्डव्दारे करायचा आहे.
5. प्रशिक्षणासाठी व अभ्यासाठी आवश्यक ते साहित्य अकॅडमीतील ग्रंथलया मधून प्रशिक्षणार्थींना पुरवण्यात येईल व त्या रकमेचा भरणा उमेदवाराने स्वत: ऑनलाईन/डेबिट कार्ड/क्रेडीट कार्डव्दारे करायचा आहे.
6. महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक येथील जी.ओ. मेस मध्ये प्रशिक्षणार्थींना जेवणाची व्यवस्था आहे. प्रशिक्षणार्थींना प्रशिक्षण कालावधीत वेतन व भत्ते मिळणार असल्याने मेस खर्च रकमेचा भरणा उमेदवाराने स्वत: ऑनलाईन/डेबिट कार्ड/क्रेडीट कार्डव्दारे करायचा आहे.
7. प्रशिक्षणार्थींने अकॅडमीमध्ये ठरवून दिलेल्या नियमांचे पालन करणे बंधनकारक आहे. सदरचे नियम त्यांना अकादमी मध्ये हजर झाल्यानंतर समजाऊन सांगण्यात येतील.

8. सर्व प्रशिक्षणार्थी व ज्या प्रशिक्षणार्थीना चष्मा असल्यास गॉगल ग्लासचा चष्मा न वापरता प्लेन चष्मा वापरुन फोटो White Red Background असलेल्या व दोन्ही कान पुर्ण दिसतील असा चेहरा समोर ठेवुन काढावेत व 10 फोटो कॉपीज सोबत आणावेत.

9. प्रशिक्षणार्थीनी प्रशिक्षण कालावधीत मौल्यवान / किमती वस्तु दागदागिने, महागडे गॉगल्स, महागडे घडयाळ इ. रोख रक्कम स्वत: सोबत बाळगू नयेत. तसेच एक कुलुप सोबत आणावे .

10. उमेदवारांनी प्रशिक्षणादरम्यान मोबाइल फोनचा वापर हा फक्त वसतीगृहाचे आवारात करावा. कॅडेटसला अकॅडमी कँपसमध्ये मोबाईल फोनचा वापर निषिध्द असुन मोबाईल फोन वापरल्यास जप्त केले जातील, व शिस्तभंग विषयक कारवाई करण्यात येईल.

11. परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक यांना सध्याच्या पदांपेक्षा वरीष्ठ पदाच्या स्पर्धा परीक्षेला (MPSC/UPSC) बसण्याची परवानगी देण्यात येईल. तसेच स्पर्धा परीक्षेला बसणाऱ्या उमेदवारांनी परीक्षा देण्यासाठी नाशिक याच परीक्षा केंद्राची निवड करावी. केवळ नाशिक या परीक्षा केंद्रावरच प्रशिक्षणादम्यान परिक्षेस बसण्याची परवानगी देण्यात येईल. तथापि, परीक्षेसाठी नाशिक केंद्र नसल्यास मुंबई केंद्राची निवड करावे. याव्यतिरिक्त इतर केंद्र निवडल्यास परीक्षेस बसण्याची परवानगी दिली जाणार नाही.

12. ज्या उमेदवारांना एखाद्या आजाराबद्दल डॉक्टरांनी मेडीसिन घेण्याचे सुचीत केले असेल अशा उमेदवारांनी सदर आजाराबाबत संबंधीत डॉक्टरांचे प्रिस्क्रिप्शनसह औषधे/गोळया ई. सोबत बाळगाव्यात आणि मपोअ येथे हजर

झाल्यास सदर बाबत वैद्यकीय अधिकारी, मपोअ, नाशिक यांना त्याबाबत अवगत करावे.

13. परि.पोलीस उप अधीक्षक यांनी सोबतआणावयाचे इतर आवश्यक साहित्य :

अ) चांगल्या प्रतीचा लॅपटॉप 01 नग तसेच स्वत:चा Email - ID तयार करून घेवून यावा.

ब) रुम मध्ये उपयोगी येणारे साहित्य.

| | |
|---|---|
| 1) ब्लँकेट | 01 नग |
| 2) चादर | 01 नग |
| 3) सफेद शर्ट (Full sleeves) | 02 नग |
| 4) सफेद ट्राउझर | 02 नग |
| 5; सिव्हील ड्रेस | आवश्यकते प्रमाणे |

14. प्रशिक्षण काळामध्ये परि.पोलीस उप अधीक्षक यांनी शक्यतो स्वत:चा विवाह/साखरपुडा आयोजित करु नये. आयोजित केल्यास फक्त रविवारची सवलत रजा मंजूर करण्यात येईल.

15. या कार्यालयातील रजा धोरणानुसार केवळ आई-वडील/पत्नी-पती/मुलगा-मुलगी (First blood relationship) यांचेमृत्यु/गंभीर आजारपणासाठीच रजा देणेबाबत विचार करण्यात येईल.

( प्रदिप जाधव )
उपसंचालक ( प्रशिक्षण )
महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक

प्रति,
सर्व परिविक्षाधीन पोलीस उप अधीक्षक, सत्र क्र.32 (CPTP-10)

प्रत,

सहा.संचालक (आय.टी.) विभाग, मपोअ, नाशिक

2/- सदर मार्गदर्शक सूचना या कार्यालयाचे संकेतस्थळावर प्रसिध्द कराव्यात.

सत्र संचालक, परि.पोलीस उप अधीक्षक, सत्र क्र.32 मपोअ, नाशिक

सहा.सत्र संचालक, परि.पोलीस उप अधीक्षक, सत्र क्र.32 मपोअ, नाशिक

सहा.संचालक (कवायत) मपोअ, नाशिक

लघुलेखक, मपोअ, नाशिक